# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,

दापोली ४१५ ७१२, जिल्हा – रत्नागिरी (महाराष्ट्र)

निम्नस्तर कृषि शिक्षण विभाग


जा. क्र. डॉबासाकोकृवि/निकृशि–ई/ ०९ /२०२१ दिनांक 06 JAN 2021

## परिपत्रक

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत सन २०२०–२१ या शैक्षणिक वर्षाच्या कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रमाच्या प्रेवेश प्रक्रियेमध्ये बरेचसे विद्यार्थी कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे प्रवेशापासून वंचित राहीले असून प्रवेश कालावधी वाढवून मिळणेबाबत कृषि पदविका विद्यालयांच्या प्राचार्यांचे विनंती पत्र या कार्यालयास प्राप्त झाले आहेत.

यास्तव उपरोक्त परिस्थिती पाहता कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रमाच्या अंतिम प्रवेशफेरी नंतर बऱ्याच जागा रिक्त राहिल्या आहेत. ही बाब विचारात घेता व विद्यर्थी प्रवेशापासून वंचित राहू नयेत म्हणून कृषि तंत्र निकेतन/विद्यालयांचे प्राचार्य यांनी केलेल्या विनंती नुसार कृषि पदविका अभ्यासक्रमास प्रवेशोच्छुक उमेदवारांना प्रवेशाची संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. यासाठी पूर्वी प्रमाणेच ऑफलाईन प्रवेश अर्ज विद्यार्थ्यांनी विद्यापीठ संकेतस्थळ www.dbskkv.org वरुन प्रिंट काढून स्वहस्ताक्षरामध्ये भरुन संबंधित रिक्त जागा असलेल्या विद्यालयात प्रवेशासाठी उपस्थित रहावे. अर्ज भरण्यासाठी विद्यापीठ संकेतस्थळावरील कृषि पदविका माहिती पुस्तिका २०२०–२१ मधील सुचनांचे तंतोतंत पालन करावे.

यापूर्वी ज्या उमेदवारांनी विद्यालयांत प्रवेश अर्ज सादर केले आहेत परंतू अपूर्ण कागदपत्रांमूळे किंवा काही कारणास्तव प्रवेश मिळालेला नाही अथवा विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला नाही अशा विद्यार्थ्यांना प्रवेश घ्यावयाचा असल्यास त्यांनी पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नाही. त्यांनी विद्यालयस्तरीय जागेवरील विशेष प्रवेश फेरीच्या प्रवेश कार्यक्रमाप्रमाणे प्रवेशासाठी विहित दिनांकास व वेळेत विद्यालयांत उपस्थित राहून आपला प्रवेश निश्चित करुन घ्यावा. परंतू अपूर्ण कागदपत्र असल्यास त्यांची पूर्तता करणे अनिवार्य आहे.

उपरोक्त प्रमाणे नव्याने अर्ज सादर करणाऱ्या व यापूर्वीच अर्जसादर केलेल्या उमेदवारांची रिक्त जागा व आरक्षण विचारात घेवून निश्चित केलेल्या प्रवेश कार्यक्रमाप्रमाणे प्रत्येक दिनांकास व विहित वेळेत प्राप्त अर्जांची छाननी करुन त्याच दिवशी अंतिम राज्यस्तरीय गुणवत्ता यादीच्या आधारे (जिल्हा बंदी न ठेवता) उमेदवारांस गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येईल सदर गुणवत्ता यादी ही त्याच दिवसाकरीता मर्यादित राहील.

कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम माहितीपुस्तिका व प्रवेश अर्ज विद्यापीठ संकेतस्थळ **www.dbskkv.org** वर प्रसिध्द करण्यात आले आहे.

विद्यालयस्तरीय जागेवरील विशेष प्रवेश फेरीचा प्रवेश कार्यक्रम

| अ. क्र. | तपशिल | दिनांक | | उपस्थिती नोंदविण्याची वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | ज्या विद्यालयात प्रवेश घ्यावयाचा आहे त्या विद्यालयात प्रवेश अर्जासह मूळ कागदपत्रे व कागदपत्रांच्या छायांकीत प्रती व विहीत शुल्कासह (रु.४००/— खुला प्रवर्ग व रु. २००/— आरक्षित प्रवर्ग) उमेदवाराने उपस्थित राहून प्रवेश घेण्याचा कालावधी. | १ | ११/१/२०२१ | सकाळी १०.०० ते दुपारी १.३० पर्यंत |
| | | २ | १२/१/२०२१ | सकाळी १०.०० ते दुपारी १.३० पर्यंत |
| | | ३ | १३/१/२०२१ | सकाळी १०.०० ते दुपारी १.३० पर्यंत |

विशेष प्रवेश फेरीत भरावयाच्या रिक्त जागांचा विद्यालयनिहाय तपशील व अनुसरावयाची कार्यपध्दती याबाबत सविस्तर सूचना सोबत जोडण्यात येत आहेत.

**उपरोक्त प्रवेश कार्यक्रमाव्यतिरिक्त इतर दिनांकास व वेळेत कुठल्याहीप्रकारे प्रवेश अर्ज विद्यालयांत स्विकारले जाणार नाहीत. याची नोंद घ्यावी.**

6.1.2021

(आ.लो.नरगलकर)

**सहयोगी अधिष्ठाता (नि.कृ.शि)**

**डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.**

सोबत : वरिल प्रमाणे

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

१. मा. शिक्षण संचालक, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.

२. मा. कुलसचिव, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.

३. मा. कुलगुरु महोदय यांचे स्विय सहाय्यक, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

**प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.**

१. सर्व प्राचार्य कृषि तंत्र विद्यालये

यांना सूचित करण्यात येते की सदरचे परिपत्रक विद्यालय नोटीस बोर्डवर व आपल्या स्तरावर इतर स्त्रोतांमधून विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी प्रसिध्द करावे व विद्यालय स्तरावर प्रवेश प्रक्रिया राबविण्यात यावी.

२. प्रभारी अधिकारी, कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

यांना विनंती करण्यात येते की सदरचे परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.

6.1.2021

सहयोगी अधिष्ठाता (नि.कृ.शि)

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.

## डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली,
## निम्नस्तर कृषि शिक्षण विभागांतर्गत कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रमाची विद्यालयस्तरीय जागेवरील विशेष प्रवेश फेरी
## (Spot Admission Round) राबविणेबाबतच्या सूचना

कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम ऑफलाईन प्रवेश प्रक्रियेची रिक्त जागांकरिता **'विद्यालयस्तरीय जागेवरी विशेष प्रवेश फेरी'** (Spot Admission Round) कार्यक्रम पत्रिकेनुसार दिनांक ११/०१/२०२१, दिनांक १२/०१/२०२१ व दिनांक १३/०१/२०२१ या कालावधीत प्रत्येक विद्यालयात राबविण्यात येणार आहे. सदर प्रवेश प्रक्रिया खालील प्रमाणे असेल.

### <u>विद्यालयस्तरीय जागेवरील विशेष प्रवेश फेरी (Spot Admission Round) प्रवेश प्रक्रिया</u>

१. कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया सन २०२०—२०२१ च्या तीनही फेऱ्या संपल्या नंतर सदर प्रवेश प्रक्रियेत रिक्त राहीलेल्या जागा दि. ११/०१/२०२१, दि. १२/०१/२०२१ व दि. १३/०१/२०२१ या दिनांकास कार्यक्रम पत्रिकेनुसार भरण्यात येणार आहेत.

२. दि. ११/०१/२०२१, दि. १२/०१/२०२१ व दि. १३/१/२०२१ रोजी प्रत्येक दिवशी सकाळी १०.०० ते १.३० या वेळेत प्रवेशासाठी आलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश अर्ज विहीत शुल्कासह व आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित व मूळ प्रतींसह जमा करुन छाननी करुन विद्यार्थ्यांची उपस्थिती नोंदविण्यात येईल व दुपारी ३.०० वाजेपासून गुणवत्ता यादी तयार करुन प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात येईल. **(वरील प्रमाणे प्रवेशासाठी उपस्थित प्रत्येक विद्यार्थ्यास संबंधित विद्यालयांतील प्राचार्यांमार्फत उपस्थिती पत्रक देण्यात येईल)**

३. उपरोक्त दिनांकास महात्मा गांधी आदिवासी जनता विद्यालयात फक्त ST उमेदवारांस प्रवेश देण्यात येईल. सदर रिक्त जागा ठाणे, पालघर, रायगड, अ.नगर, नंदूरबार, धूळे, नाशिक या सर्व जिल्हयातील उमेदवारांमधून एकत्रित गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.

**<u>(टिपः— सदर अ. क्र. ३ प्रवेश प्रक्रिया सुचना फक्त महात्मा गांधी आदिवासी जनता विद्यालय, कोसबाडहिल, ता. डहाणू, जि. पालघर फक्त याच विद्यालयासाठी आहे)</u>**

४. अनुदानित व विनाअनुदानित कृषि तंत्र विद्यालय व कृषि तंत्र निकेतनातील राखीव प्रवर्गातील रिक्त जागा CR General अंतर्गत सरमिसळ करुन **(SC/ST/VJ(A)/NT(B)/NT(C)/NT(D)/OBC/EWS)** नोंदणीकृत उपस्थित उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार भरल्या जातील. तसेच एकूण प्रवेश क्षमतेनुसार त्यात्या प्रवर्गामध्ये ३० टक्के महिलांसाठी आरक्षित आहेत. महिला उमेदवार उपलब्ध नसल्यास त्याऐवजी पुरूष उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

५. उपरोक्त प्रवेश प्रक्रियेनंतर जर जागा रिक्त राहिल्यास सर्वप्रथम एकूण प्रवेश क्षमतेच्या जास्तीत जास्त २% टक्यांपर्यंत विशेष मागास प्रवर्ग (SBC) उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. या पध्दतीनेही आरक्षित जागांपैकी काही जागा रिक्त राहिल्यास त्या गुणवत्तेनुसार दिनांक १३.०१.२०२१ रोजी इतर नोंदणीकृत उमेदवारामधून CO General अंतर्गत भरण्यात येतील. तसेच खुल्या प्रवर्गातील रिक्त असलेल्या जागा गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.

६. उपरोक्त प्रवेश प्रक्रियेसाठी उमेदवारांची गुणवत्ता व आरक्षण विचारात घेवून दिनांक ११/०१/२०२१, दि. १२/०१/२०२१ व दि. १३/०१/२०२१ या प्रत्येक दिवशी विहित वेळेत प्राप्त अर्जाची छाननी करुन प्रत्येक दिवशीच्या अंतिम स्थ्यस्तरीय गुणवत्ता यादीच्या आधारे (जिल्हाबंदी न ठेवता) उमेदवारांना प्रवेश वाटप करण्यात येईल. सदर गुणवत्ता यादी ही त्याच दिवसा करीता मर्यादित राहील. **(प्रत्येक दिवसाकरीता प्रवेशोच्छूक विद्यार्थ्यांच्या उपस्थिती प्रमाणे गुणवत्ता यादी तयार करुन त्या विद्यार्थ्यांना त्याच दिवशी आरक्षण विचारात घेवून** (CR General / Open General) **गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येईल.** CR General **जागांपैकी काही जागा रिक्त राहिल्यास अ.क्र.५ प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.)**

७. दि. ११/०१/२०२१, दि. १२/०१/२०२१ व दि. १३/०१/२०२१ रोजीची प्रवेश प्रक्रिया उपरोक्त अ. क्र. १ ते ६ येथे दर्शविल्याप्रमाणे विद्यालयस्तरावर राबविण्यात येईल. यासाठी सदर कालावधीमध्ये उमेदवारांस कृषि पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशसाठी नव्याने अर्ज सादर करता येतील.

८. ज्या विद्यार्थ्यांना नव्याने प्रवेश अर्ज सादर करावयाचे आहेत त्यांनी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या www.dbskkv.Org या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या माहिती पुस्तिका २०२०—२१ मधील सुचनांचे पालन करुन विद्यापीठ संकेतस्थळावरील अर्जाची प्रिंट काढून स्वहस्ताक्षरात भरुन ज्या विद्यालयात प्रवेश घ्यावयाचा आहे त्या कृषि विद्यालयात विहित शुल्कासह व आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकीत व मूळ प्रतींसह दि. ११/०१/२०२१, दि. १२/०१/२०२१, व १३/०१/२०२१ या कालावधीत प्रत्येक दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी १.३० या कालावधी पर्यंत उपस्थिती नोंदविणे आवश्यक आहे.

९. विद्यार्थ्यांनी प्रवेशसाठी कृषि पदविका माहिती पुस्तिकेतील पृ. क्र. ५ ते ९ वर नमुद करण्यात आलेल्या विद्यालयांशी सोबत जोडण्यात आलेल्या रिक्त जागांचा तपशील पाहून प्रत्यक्ष संपर्क साधून संबंधित विद्यालयात प्रवेशासाठी उपस्थित रहावे.

१०. उपरोक्त कालावधीमध्ये प्रत्येक दिवशी स्वतंत्र गूणवत्ता यादी तयार करण्यात येईल. सदर गुणवत्ता यादी ही त्या दिवसाकरीताच मर्यादित राहील.

११. ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी विद्यालयांमध्ये अर्ज केले आहेत परंतू त्यांनी अंतिम प्रवेश निश्चित केलेला नाही, अशा विद्यार्थ्यांनी पून्हा अर्ज करण्याची आवश्यकता नसून उपरोक्त दिनांकास प्रवेश प्रक्रियेमध्ये संबंधित विद्यालयांत उपस्थित राहून सहभागी होवून आपला प्रवेश गूणवत्तेनुसार निश्चित करुन घ्यावयाचा आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांचे यापूर्वीचे अर्ज काही कारणास्तव रद्द झालेले आहेत अशा विद्यार्थ्यांनी कागदपत्रांची पूर्तता करुन विद्यालयात प्रवेशासाठी उपस्थित राहावे.

१२. ज्या विद्यार्थ्यांनी विहीत वेळेत उपस्थिती (Reporting) नोंदविलेली आहे. अशाच विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रिया सभागृहामध्ये प्रवेश दिला जाईल. **उपरोक्त सर्व प्रवेश प्रक्रिया संबंधित विद्यालयांतच राबविण्यात येणार आहे.**

6.1.2021

सहयोगी अधिष्ठाता
निम्नस्तर कृषि शिक्षण विभाग

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रमाच्या दिनांक ११/०१/२०२१, १२/०१/२०२१ व १३/०१/२०२१ रोजी विद्यालयस्तरीय जागेवरील विशेष प्रवेश फेरी अंतर्गत भरावयाच्या जागांचा तपशिल (प्रथम/द्वितीय/तृतीय प्रवेश फेरीनंतर रिक्त राहीलेल्या जागा)

| अ. क्र. | कृषि तंत्र निकेतन/विद्यालयाचे नांव | सांकेतिक क्रमांक | प्रवेश क्षमता | भरलेल्या जागा | भरावयाच्या रिक्त जागा | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | OPEN | CR | Total |
| अ) | घटक व संलग्न अनुदानित कृषि तंत्र विद्यालये | | | | | | |
| १ | कृषि तंत्र विद्यालय, रोहा, ता. रोहा, जिल्हा – रायगड (घटक) | २१४१०३ | ६० | १९ | १० | ३१ | ४१ |
| २ | कृषि तंत्र विद्यालय, लांजा, ता. लांजा, जिल्हा – रत्नागिरी (घटक) | २१५१०२ | ६० | १२ | १४ | ३४ | ४८ |
| ३ | कृषि तंत्र विद्यालय, कोसबाड हिल, ता. डहाणू, जिल्हा – पालघर (संलग्न) | २१३१०४ | ५० | ३८ | ४ | ८ | १२ |
| ४ | महात्मा गांधी आदिवासी जनता विद्यालय, कोसबाड हिल, ता.डहाणू, पालघर (संलग्न) | २१३१०५ | ५० | ४० | ० | १० | १० |
| ५ | मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम, शिरगांव | १४१०१ | ३० | ३० | ० | ० | ० |
| ब) | कायमस्वरुपी विना अनुदानित कृषि तंत्र विद्यालय/निकेतने | | | | | | |
| | ठाणे जिल्हा | | | | | | |
| ६ | कृषि तंत्रनिकेतन, सरळगांव, ता.मुरबाड, जिल्हा – ठाणे | २१३१०६ | ६० | ६० | ० | ० | ० |
| ७ | श्री तिसाई कृषि तंत्रनिकेतन, लेनाड बु./, ता.–शहापूर, जिल्हा –ठाणे | २१३१०८ | ६० | ६० | ० | ० | ० |
| ८ | मंदार कृषि तंत्रनिकेतन, कोळींब, ता. कल्याण, जिल्हा –ठाणे | २१३११२ | ६० | ५२ | ० | ८ | ८ |
| ९ | कृषि तंत्रनिकेतन, खानिवली, पो. वासिंद,ता. भिवंडी, जिल्हा –ठाणे | २१३११४ | ६० | ६० | ० | ० | ० |
| १० | केशवसृष्टी कृषि तंत्रनिकेतन, उत्तन भाईंदर, जिल्हा –ठाणे | २१३१०९ | ६० | ६० | ० | ० | ० |
| | पालघर जिल्हा | | | | | | |
| ११ | कृषि तंत्रनिकेतन, आसनगांव, ता. डहाणू, जिल्हा –पालघर | २१३११३ | ६० | ५२ | ० | ८ | ८ |
| १२ | कृषि तंत्रनिकेतन, विरेवाडी, ता. डहाणू, जिल्हा –पालघर | २१३३७० | ६० | ६० | ० | ० | ० |
| | रायगड जिल्हा | | | | | | |
| १३ | कृषि तंत्रनिकेतन, गालसुरे, ता. श्रीवर्धन, जिल्हा –रायगड | २१४३५९ | ६० | ६० | ० | ० | ० |
| १४ | कृषि तंत्रनिकेतन, नांदगांव खुर्द, पो. तळोशी ता.महाड, जिल्हा –रायगड | २१४३५४ | ६० | १४ | १० | ३६ | ४६ |
| १५ | च. रं. म्हसे कृषि तंत्रनिकेतन, वारे, पो. कळंब, ता. कर्जत , जिल्हा –रायगड | २१४११७ | ६० | ६० | ० | ० | ० |
| १६ | मोतीराम जगताप कृषि तंत्रनिकेतन, कोकरे, तर्फे नाते, पो.आचळोली, ता. महाड, रायगड | २१४११८ | ६० | ०० | २४ | ३६ | ६० |
| | रत्नागिरी जिल्हा | | | | | | |
| १७ | कृषि तंत्र विद्यालय, सुकीवली, ता. खेड, जिल्हा –रत्नागिरी | २१५११९ | ६० | १३ | १३ | ३४ | ४७ |
| १८ | कृषि तंत्रनिकेतन, खवटी, ता. खेड, जिल्हा –रत्नागिरी | २१५३६० | ६० | ५७ | ० | ३ | ३ |
| १९ | द.ग. तटकरे, कृषि तंत्र विद्यालय, खरवते–दहिवली, ता. चिपळून, जि. रत्नागिरी | २१५१२२ | ६० | ९ | १५ | ३६ | ५१ |
| २० | प्रा. मधु दंडवते कृषि तंत्रनिकेतन, देवरुख (मातृमंदिर) ता. संगमेश्वर, रत्नागिरी | २१५१२८ | ६० | ५४ | ० | ६ | ६ |
| | सिंधुदुर्ग जिल्हा | | | | | | |
| २१ | कृषि तंत्र विद्यालय, पाडलोस, ता. सावंतवाडी, जिल्हा –सिंधुदुर्ग | २१६३५६ | ६० | १७ | ८ | ३५ | ४३ |
| २२ | कै. काकासाहेब तावडे कृषि तंत्र विद्यालय, वडाचापाट, ता. मालवण, सिंधुदुर्ग | २१६३५३ | ६० | ०० | २४ | ३६ | ६० |
| २३ | कृषि तंत्रनिकेतन, सांगुळवाडी, ता. वैभववाडी, जिल्हा –सिंधुदुर्ग | २१६१३० | ६० | २६ | ७ | २७ | ३४ |
| २४ | कृषि तंत्रनिकेतन, माडखोल, ता.सावंतवाडी, जिल्हा –सिंधुदुर्ग | २१६११४ | ६० | २६ | ० | ३४ | ३४ |
| २५ | कृषि तंत्र विद्यालय, वळीवंडे, ता.देवगड, जिल्हा –सिंधुदुर्ग | २१६३५५ | ६० | ६० | ० | ० | ० |
| २६ | श्रीमती सुमनी मराठे कृषि तंत्र विद्यालय, फोंडाघाट, , ता. कणकवली, सिंधुदुर्ग | २१६१३२ | ६० | ६० | ० | ० | ० |
| २७ | कृषि तंत्र विद्यालय, हरकुळ बुद्रुक, ता. कणकवली,जिल्हा –सिंधुदुर्ग | २१६३६६ | ६० | ३३ | ० | २७ | २७ |
| | | एकूण | १५७० | १०३२ | १२९ | ४०९ | ५३८ |

सहयोगी अधिष्ठाता (नि.कृ.शि.) 6.1.2021

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली